CNR No. MHRG120003422018

नियमीत दिवाणी दावा क्र. २५/२०१८

लिलाधर व इतर वि. चिंतामणी व इतर

## निशाणी क्र.३२ कडील आदेश

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादींनी त्यांच्या विरुध्द निशाणी क्र. ९ कडे झालेला विना म्हणणे आदेश रद्द करून म्हणणे दाखल करण्याची परवानगी मिळण्यासाठी दाखल केला आहे. अर्जातील थोडक्यात कथन असे आहे की, प्रतिवादी यांच्या विरुध्द निशाणी क्र. ९ कडील न्यायालयीन आयुक्त नियुक्त करण्याच्या अर्जावर दिनांक १६/०६/२०२२ रोजी विना म्हणणे आदेश पारीत झाला आहे. प्रतिवादींकडून सदर अर्जावर अनावधानाने म्हणणे देण्याचे राहून गेले. त्यामुळे त्यांनी प्रस्तूतचा अर्ज मंजूर करण्याची मागणी केली आहे. वादींनी आपले म्हणणे दाखल करुन योग्य तो आदेश पारीत करण्याची मागणी केली आहे. प्रतिवादी वर्फे विद्वान वकील श्री. ए. व्ही. देशपांडे आणि वादी तर्फे विद्वान वकील श्री. एम. जे. तांबडकर यांचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादी यांच्या विरुध्द विना म्हणणे आदेश पारीत झाला असला तरी अर्जाचा निकाल गुण-अवगुणावर लागण्यासाठी न्यायाच्यादृष्टीने प्रतिवादीस आपले म्हणणे मांडण्याची संधी देणे आवश्यक दिसून येते. करीता मी खालील आदेश पारीत करतो-

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादींविरुध्द निशाणी क्र. ९ कडे झालेला विना म्हणणे आदेश रद्द करून म्हणणे दाखल करण्याची परवानगी देण्यात येते.

(खुल्या न्यायालयात जाहिर)

(सं. गं. सरोदे)

दिनांक : ०२/०७/२०२२

दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, मुरुड